# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेवर लक्ष केंद्रित करून प्रशासनात यावे -सहाय्यक जिल्हाधिकारी सौम्या शर्मा

देगलूर-ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेवर लक्ष केंद्रित करून प्रशासनात यावे, तसेच विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी मार्गदर्शन करण्यासाठी आपण तयार आहोत, अशी ग्वाही सौम्या शर्मा (सहाय्यक जिल्हाधिकारी) यांनी दिली. प्रा. उत्तमकुमार कांबळे मित्र परिवार आयोजित स्पर्धा परीक्षा बक्षीस वितरण व देगलूर महाविद्यालय देगलूर येथे आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरात त्या बोलत होत्या. शिबिराच्या अध्यक्षस्थानी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांची उपस्थिती होती.

महात्मा ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोहळा नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. गौतम भालेकर व प्रकाश सोनकांबळे यांच्या बदलून टाकू समाज जीवन या गीताने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उत्तम-कुमार कांबळे यांनी केले. कठोर शिस्त असेल तरच विद्यार्थी घडत



असतो असे मत व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी व्यक्त केले. मी या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे. या महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा विद्यार्थ्यांनी कायम ठेवावी असा मानस रामदास पाटील सुमठाणकर यांनी बोलून दाखवला. या परी-क्षेत प्रथम क्रमांक बालाजी मैलागिरे, द्वितीय क्रमांक सचिन कडलवार व तृतीय क्रमांक अनिता उल्लेवार यांनी पटकावला. सचिन जाधव, अविनाश माळगोंडे व श्यामसुंदर भंडरवार यांना उत्तेजनार्थ पारितोषिक म ान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

विद्यार्थ्यांना युपीएससींची तयारी करण्यास काही मदत हवी असेल तर ती मदत करण्यास आपण तयार आहोत, असे आश्वासन खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिलकुमार वाघमारे यांनी केले. प्रा. विशाल बोरगावकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास भाजपाचे जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, लक्ष्मणराव ठक्करवाड, माजी नगराध्यक्ष गंगाधर जोशी, रामदास पाटील सुमठाणकर, अ. व्या.शि. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, सोहन माछरे( पोलिस निरीक्षक) कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अनिकेत पाटील राजूरकर, प्रा.डॉ. संजय कांबळे, प्रा. डॉ. व्हि. जी. शेरीकर, शिवाजी कनकंटे (तालुकाध्यक्ष भाजप), श्रावण पाटील भिलवंडे, अनिल पाटील खानापूरकर, अशोक गंदपवार माजी. नगरसेवक, प्रशांत दासरवाड गटनेता भाजप, अशोक साखरे, दिगंबर कौरवार, निवृत्ती कांबळे, अशोक कांबळे, नामदेव पाटील थडके, डॉ. प्रतीक सूर्यवंशी, अविनाश देशपांडे हसनाळकर, प्रल्हाद उमाटे, अनिल कदम, व्यंकटराव बोरगावकर, अशोक डुकरे, गंगाधर दाऊलवार इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.